# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

E-Mail :-desk5@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ**

**कालमर्यादित**

क्र. ५/आस्था/पदांची माहिती/२०१९/८८.

दिनांक : 13 MAR 2019

*प्रति,*

*सहसंचालक,*
*तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,*
*मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.*

विषय : ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थामधील पदांची दि.१ जानेवारी, २०१६ रोजीची माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसुचना, दिनांक ३० जानेवारी, २०१९.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाची संदर्भाधीन अधिसुचना पहावी.

उपरोक्त अधिसुचनेद्वारे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यांत आलेला आहे त्याच धर्तीवर अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागु करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावायचा असल्याने आपल्या विभागांतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थांची सोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रातील माहिती एकत्रित करुन तात्काळ विनाविलंब <u>दिनांक १६ मार्च २०१९</u> पुर्वी Excel sheet इमेल द्वारे (desk5@dtemaharashtra.gov.in) संचालनालयास सादर करण्यांत यावी. उपरोक्त माहिती सादर करताना खालील प्रमाणे सुचनांचे पालन करण्यात यावे.

१. आपल्या विभागांतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थांची दिनांक ०१/०१/२०१६ रोजीची मंजुर व रिक्त पदांची माहिती विहित विवरणपत्रात देण्यांत यावी.

२. सदर माहिती ***Excel*** मध्ये ***Font DVOT- Yogesh, font size 14*** मध्ये तयार करावी, तसेच या माहिती मध्ये सर्व अंक इंग्रजीमध्ये (*उदा.* ***1, 2, 3, 4***) असे नमुद करावे.

३. **सॉफ्ट** कॉपीत रकाना क्रमांक ८,येथे गट नमुद करताना ते अ,ब,क, प्रमाणेच नमुद करावेत.

४. आपल्या विभागातील काही पदे वगळली असतील तर निळया रंगाने दर्शवुन त्याबाबतचा शासन निर्णय अभिप्राय या रकान्यात नमुद करावा.

५. आपल्या विभागातील काही पदांच्या वेतन संरचनेमध्ये, पदनामामध्ये बदल केला असल्यास तो लाल रंगाने दर्शवुन त्याबाबतचा शासन निर्णय अभिप्राय या रकान्यात नमुद करावा.

६. आपल्या विभागातील काही पदे नव्याने निर्माण करण्यांत आली असल्यास ती पदे कार्यालयाच्या शेवटच्या पदनामाखाली स्वतंत्ररित्या हिरव्या रंगाने दर्शवुन त्याबाबतचा शासन निर्णय अभिप्राय या रकान्यात नमुद करावा.

७. आपल्या विभागातील काही पदांची वेतन संरचना, पदनाम याबाबत शंका असल्यास ती जांभळया रंगाने दर्शवावित.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई